# मराठी पाऊल पडते पुढे...



दादासाहेब फाळके


बाबूराव पेंटर


व्ही. शांताराम


भालजी पेंढारकर


मा. विनायक


राजा परांजपे

**एकूण भारतीय चित्रपटाच्या इतिहासात मराठी चित्रपटाचे स्थान विशेष आहे. कारण हिंदी व अन्य प्रादेशिक चित्रपटांना दिशा दाखवण्याचे काम नेहमी मराठी चित्रपट करत आलाय. व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर, मास्टर विनायक, राजा परांजपे, राजा नेने, अनंत माने ते आजच्या काळातले राज दत्त, जब्बार पटेल, अमोल पालेकर या मंडळींनी मराठी चित्रपटाला राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्यातनाम केले. त्याच मराठी चित्रसृष्टीतली काही सीमाचिन्हे...**

□ इसाक मुजावर

हिंदी आपली राष्ट्रभाषा असल्यामुळे हिंदी चित्रपट आपल्या देशातील राष्ट्रीय चित्रपट आहे. भाषिक चित्रपटांना भाषेची मर्यादा असल्यामुळे हिंदी चित्रपटांची 'राष्ट्रीयता' कधीच मिळणे शक्य नाही. म्हणूनच हिंदी चित्रपटांच्या तुलनेत प्रादेशिक चित्रपट म्हणून या चित्रपटांचा विचार आपण करीत असतो. पण काही प्रादेशिक चित्रपट असे आहेत की हिंदीच्या तुलनेत त्यांची बाजारपेठ मर्यादित असली तरी या मर्यादित बाजारपेठेत होणारा त्यांचा धंदा हिंदी चित्रपटांच्या धंद्याहून कितीतरी पटीने अधिक आहे.


भारतीय चित्रपटांमध्ये मराठी चित्रपटाचे योगदान इतर भाषिक चित्रपटांमध्ये नक्कीच वरचे आहे. त्यात व्ही. शांताराम यांचे नाव अग्रणी

राहील. सुरूवातीच्या काळात जे चित्रपट शांताराम बापूंनी निर्माण केले ते काळाच्या कितीतरी पुढे गेलेले चित्रपट होते. त्यांच्या या चित्रपटांनी खऱ्या अर्थाने आपल्या चित्रपटांचा व चित्रपटांच्या विकासाचा पाया घातला. समांतर चित्रपट आजच्या आपल्या चित्रपटांचा कळस असेल तर तो कळस शांताराम बापूंनी चित्रपट व्यवसायाचा जो मजबूत पाया घातला त्या पायाच्या आधारावरच आहे. शांताराम बापूंचे व त्यांच्या चित्रपटांचे हे ऋण आपल्याला कधीच विसरता येणार नाही.

हिंदी आणि त्याचबरोबर दाक्षिणात्य व बंगाली चित्रपटात नव्या म्हणून ज्या अनेक गोष्टी आज आपल्याला दिसतात त्याचा पाया कितीतरी वर्षाआधी मराठी चित्रपटांनीच येथे घालून ठेवला आहे.

हिंदीत रंगीत चित्रपटांचे युग सुरू झाले ते १९६१च्या *जंगली* या चित्रपटाच्या यशानंतरच. त्याआधी *आन*, *झाँसी की रानी* यासारखे काही रंगीत चित्रपट आपल्याकडे आले होते. पण हे रंगीत चित्रपटांचे युग *जंगली*नंतरच खऱ्या अर्थाने आपल्याकडे सुरू झाले आणि त्यानंतर तामिळ, तेलगू, कानडी, मल्याळी, बंगाली यासारखे प्रादेशिक चित्रपट देखील पाहता पाहता रंगीत झाले. मराठीत मात्र हा रंग यायला फार उशीर झाला. १९६१च्या *जंगली* नंतर एका तपाने म्हणजे १९७२ साली शांताराम बापूंच्या *पिंजरा* या चित्रपटाद्वारा रंगीत चित्रपटांचा जमाना खऱ्या अर्थाने मराठीत आला. तरीही रंगीत चित्रपटांचा विचार करताना मराठी चित्रपटाला आपल्याला नजरेआड करता येणार नाही. कारण बोलपट बाल्यावस्थेत असताना भारतातील पहिला रंगीत चित्रपट निर्माण झाला तो मराठीतच. १९४३ साली पडद्यावर आलेला *सैरंध्री* हा भारतातील पहिला रंगीत चित्रपट मराठी भाषेतच होता आणि तो प्रभातने निर्माण केला होता. या चित्रपटानंतर जवळ जवळ ५० वर्षांनी *पिंजरा*द्वारा मराठीत रंगीत चित्रपटांचा जमाना आला. पण हिंदीत राहून रंगीत चित्रपटांना एक वेगळी दिशा दाखविण्याची कामगिरी मराठी माणसांनीच या काळात केली. *झाँसी की रानी*, *आन* हे खऱ्या अर्थाने निर्माण झालेले सुरूवातीचे रंगीत चित्रपट. या चित्रपटांच्या निर्मितीच्या वेळी आपल्याकडे रंगीत छायाचित्रण जमेल याची कुणाला खात्री वाटत नव्हती. म्हणूनच *आन* ब्लॅक ॲण्ड व्हाईटमध्येच चित्रीत करून त्याच्या रंगीत प्रिंटस् परदेशातून तयार करून आणण्यात आल्या होत्या. तर *झाँसी की रानी*च्या रंगीत छायाचित्रणासाठी परदेशी छाया लेखकाला पाचारण करण्यात आले होते. अशावेळी आपला माणूसदेखील रंगीत छायाचित्रण करू शकेल, हा आत्मविश्वास शांताराम बापूंनी आपल्या चित्रपट व्यावसायिकांत निर्माण केला. जी. बालकृष्ण या मराठी छाया लेखकाला *झनक झनक पायल बाजे* या आपल्या हिंदी रंगीत चित्रपटाचे छायालेखन करायला लावले.


क्रेन व ट्रॉली शॉट आज आपल्या चित्रपटातील एक सर्वसाधारण गोष्टच बनली आहे. हे 'क्रेन व ट्रॉली' शॉटस् प्रभातनेच मूकपटांच्या जमान्यात आपल्या *चंद्रसेना* या चित्रपटाद्वारा आपल्या चित्रपटात सर्वात प्रथम आणले व १९३४च्या प्रभातच्या *अमृतमंथन* या मराठी चित्रपटानेच झूम शॉटस् व क्लोजअप्सचा आपल्या चित्रपटात खऱ्या अर्थाने पाया घातला. चित्रपटाच्या यशात रौप्य महोत्सवाला एक वेगळेच महत्त्व असते. हे रौप्य महोत्सवी यश १९३२ साली भालजी पेंढारकरांनी सरस्वती सिनेटोनसाठी दिग्दर्शित केलेल्या *श्यामसुंदर* या मराठी चित्रपटानेच आपल्या चित्रपटांना सर्वात प्रथम दाखविले. १९३४ साली प्रभातने निर्माण केलेला *अमृतमंथन* हा चित्रपट हिंदी व मराठी या दोन भाषात होता. या चित्रपटाच्या हिंदी आवृत्तीने सुवर्ण महोत्सवी यश मिळवून आपल्या चित्रपटांना सर्वात प्रथम सुवर्ण महोत्सवापर्यंत पोहोचवले. सुवर्ण महोत्सव साजरा करणारा हा पहिला मराठी चित्रपट. या चित्रपटाने केवळ मराठी चित्रपटांनाच नव्हे तर भारतीय चित्रपटांना सर्वात प्रथम आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखवला गेलेला व तेथे पारितोषिक मिळविणारा हा पहिला भारतीय चित्रपट. हेच यश त्यानंतरच्या प्रभातच्या *संत ज्ञानेश्वर* या चित्रपटाने परदेशात मिळविले होते.



पहिला मराठी बोलपट *राजा हरिश्चंद्र*



*श्यामसुंदर* चित्रपटात भालजी व शाहू मोडक



*ब्रह्मचारी* चित्रपटात मा. विनायक व मीनाक्षी



*ब्रह्मचारीत गाजलेली बेदिंग सूटमधील मीनाक्षी*



*माणूसमध्ये शांता हुबळीकर*



*अमृतमंथन*

फ्रेन्क काप्रा या हॉलिवूडच्या दिग्दर्शकाने या चित्रपटावर एक खास लेख लिहून वृत्तपत्रांतून या चित्रपटाचा गौरव केला होता.

राज कपूरच्या *बॉबी* या चित्रपटाने हिंदी चित्रपटात टिनएजर प्रेमकथांवरील चित्रपटाचे एक नवे मन्वंतर आणले आणि या मन्वंतराने हिंदी चित्रपटांना एक तरूणाई दिली. परंतु या तरूणाईचा पाया देखील मराठी चित्रपटांना आपल्या चित्रपटात सर्वात प्रथम घातला ही गोष्ट आपल्याला नजरेआड करता येणार नाही. १९३७चा मास्टर विनायक यांचा *प्रेमवीर* हा चित्रपट म्हणजेच आपल्या चित्रपटांनाही तरूणाई देणारा पहिला चित्रपट. आज आपल्या अनेक चित्रपटांत आपण कॉलेजकुमार कॉलेजकुमारींना नायक नायिका म्हणून पाहतो. *प्रेमवीर*नेच या कॉलेजकुमार व कॉलेजकुमारीला नायक नायिका म्हणून आपल्या चित्रपटात सर्वात प्रथम पडद्यावर आणले. नायिकेचे प्रेम संपादन करण्यासाठी निरनिराळी सोंगे घेणारा नायक आज आमिर खान, गोविंदा यासारख्या तरूण अभिनेत्यांच्या चित्रपटात देखील आपण पाहतो. हा नायक मास्टर विनायकांनी *प्रेमवीर* या चित्रपटाद्वाराच आपल्या चित्रपटात सर्वात प्रथम आणला. आज बिकिनीचे युग असल्यामुळे कमीतकमी कपड्यातील नायिका आपल्या चित्रपटात सर्रास दिसतात. पण ज्या काळात आपल्या चित्रपटातील नायिकेचा पदर देखील खांद्यावरून खाली ढळत नव्हता त्या काळात म्हणजे १९३८ साली मास्टर विनायकांनी आपल्या *ब्रह्मचारी* या मराठी चित्रपटात अभिनेत्री मीनाक्षीला (शिल्पा शिरोडकरची आजी) बेदिंग सूटमध्ये पडद्यावर आणण्याचे धाडस केले होते. बेदिंग सूटमधील नायिका म्हणजे त्याकाळात आपल्या चित्रपटांना त्यांनी बहाल केलेली तरूणाईच होती. १९४०चा त्यांचा *लपंडाव* हा चित्रपट के. नारायण काळे यांनी दिग्दर्शित केला होता तर १९४३चा त्यांचा *चिमुकला संसार* हा चित्रपट वसंतराव जोगळेकर यांनी दिग्दर्शित केला होता. या दोन्ही चित्रपटांची संकल्पना मास्टर विनायक यांचीच होती. या दोन चित्रपटांच्यावर एक नजर टाकली तर त्या काळातला मराठी चित्रपट काळाच्या किती पुढे होता याची कल्पना येईल. केवळ मराठीच नव्हे तर हिंदी चित्रपटातील नायिका देखील ज्या काळात काकूबाईच्या थाटात वावरत होती त्या काळात मास्टर विनायकांनी *लपंडाव* या चित्रपटात टेनीस खेळणारी नायिका आपल्या चित्रपटात पडद्यावर आणली होती. तर *चिमुकला संसार* या चित्रपटात क्रिकेटर नायक त्यांनी पडद्यावर आणला होता.

सामाजिक चित्रपटांचा पाया घालण्याचे श्रेय देखील मराठी चित्रपटांनाच द्यावे लागेल. मूकपटांच्या जमान्यात व बोलपटांच्या आरंभीच्या काळात आपल्या चित्रपटांवर पौराणिक व ऐतिहासिक कथांचा प्रभाव होता. १९२५ साली कलामहर्षी बाबूराव पेंटर यांनी *सावकारी पाश* हा सामाजिक मूकपट निर्माण करून भारतात सामाजिक चित्रपटांच्या निर्मितीचा पाया सर्वात प्रथम घातला. सत्यजित राय यांच्या बंगाली चित्रपटानंतर आपल्याकडे नववास्तववादी चित्रपटांचे एक नवे युग अवतरले. या नववास्तववादाची सुरूवात देखील बाबूराव पेंटर यांच्या *सावकारी पाश* या चित्रपटानंतरच खऱ्या अर्थाने मराठी चित्रपटात झाली. बोलपटांच्या आगमनानंतर १९३५ साली निर्माण झालेला मास्टर विनायक यांचा *विलासी ईश्वर* हा मराठीतला पहिला सामाजिक बोलपट. तो फारसा चालला नव्हता. तरीही मास्टर विनायकांनी धंद्यासाठी पौराणिक कथांवरील चित्रपटांशी तडजोड केली नाही. त्यानंतर *छाया, देवता, धर्मवीर, अमृत* यासारखे सामाजिक चित्रपट सातत्याने निर्माण करून त्यांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही सामाजिक चित्रपटांच्या निर्मितीला एक नवी दिशा दाखवली. क्राईम डू नॉट पे हे बहुसंख्य हिंदी चित्रपटांच्या कथेचे सूत्र आज बनले आहे. हे सूत्र त्या काळात मामा वरेरकर यांच्या कथेवरून तयार झालेल्या व पार्श्वनाथ आळतेकरांनी दिग्दर्शित केलेल्या *गीता* या मराठी चित्रपटानेच सर्वात प्रथम आणले. बालचित्रपटांची निर्मिती आज आपल्या देशातील एक चळवळ बनली आहे. चित्रपटांकडे तोवर कुणी एक चळवळ म्हणून पहात नव्हते. अशा काळात १९३८ साली *ध्रुव* हा चित्रपट निर्माण करून राजा पंडितांनी बालचित्रपटांच्या निर्मितीचा पाया सर्वात प्रथम घातला.

स्वातंत्र्योत्तर काळात बालचित्रपट समितीची स्थापना झाली आणि अनेक बाल चित्रपट निर्माण झाले. या सर्व बालचित्रपटांहून *ध्रुव* या बालचित्रपटाचे एक वेगळेपण होते. ते म्हणजे या चित्रपटातील लहानापासून थोरापर्यंतच्या सर्व भूमिका बालकलाकारांनीच केल्या होत्या. या चित्रपटानंतर पूर्णपणे बाल कलावंतांनीच भूमिका केलेला एकही चित्रपट आपल्याकडे निर्माण झालेला नाही.

गीत विरहित चित्रपट आजही आपल्याकडे एक नवलाई आहे. विश्राम बेडेकरांनी १९३५ साली *ठकीचं लग्न* व *सत्याचे प्रयोग* या आपल्या दोन चित्रपटांद्वारा गीत विरहित चित्रपटांचा प्रयोग केवळ मराठीतच नव्हे तर हिंदी चित्रपटात देखील सर्वात प्रथम केला. हिंदी चित्रपटात अनेकदा आज आपण इंग्रजी गाणे ऐकतो. १९३७ साली शांताराम बापूंनी प्रभातच्या *कुंकू* या चित्रपटात गायिका अभिनेत्री शांता आपटे यांना एक इंग्रजी गाणे गायला लावून इंग्रजी गाण्याचा प्रयोग सर्वात प्रथम मराठीतच केला. जरठ-बाला विवाह हा त्या चित्रपटाच्या कथेचा विषय होता. हा विषय पडद्यावर आणताना ज्या चित्रपटाच्या कथेत कोठेही प्रेम प्रकरण नाही, अशी कथा पडद्यावर आणण्याचा पहिला प्रयोग शांताराम बापूंनी या चित्रपटात करणे हे या चित्रपटाचे एक वेगळेपण होते. आज आपल्या अनेक चित्रपटांत आपण पोलीस नायक पाहतो. हा पोलीस नायक १९३९च्या *माणूस* या चित्रपटाद्वारा शांताराम





पिंजरामध्ये संध्या



हा माझा मार्ग एकलामध्ये सचिन-राजा परांजपे



एक गाव बारा भानगडीमध्ये अरूण सरनाईक-जयश्री गडकर

बापूंनीच आपल्या चित्रपटात सर्वात प्रथम आणला आणि या चित्रपटाच्या नायिका शांता हुबळीकर यांना 'आता कशाला उद्याची बात' हे गाणं गायला लावून आपल्या चित्रपटातील बहुभाषी गाण्याचा प्रयोग या चित्रपटात त्यांनीच सर्वात प्रथम केला.

स्वातंत्र्यपूर्व काळ हा मराठी चित्रपटांचा सुवर्णकाळ होता आणि तेव्हा हिंदी चित्रपटांची स्पर्धा मराठी चित्रपटांना जाणवत नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात ही स्पर्धा मराठीला जाणवू लागली. तरीही या काळात अनेक नवनवे प्रयोग करून मराठी चित्रपटांनी आज हिंदीत दिसणाऱ्या अनेक गोष्टींचा पाया इथे घातला. अशोककुमार नायकाचा जेव्हा चरित्र अभिनेता बनला तेव्हा चरित्र नायकाला प्राधान्य देणाऱ्या चित्रपटांचा एक जमाना हिंदी चित्रपटात आला. स्वातंत्र्यपूर्ण काळात केशवराव दाते, बाबूराव पेंढारकर, गजानन जहागीरदार, दादासाहेब साळवी यासारख्या कलावंतांनी चरित्र अभिनेत्यांना प्राधान्य देणाऱ्या चित्रपटांचा हा जमाना येथे आणला होता. स्वातंत्र्योत्तर काळात राजा परांजपे, ग. दि. माडगुळकर यांनी *पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट,. ऊन पाऊस* या चित्रपटांद्वारे चरित्र अभिनेत्यांना प्राधान्य देणारा हा चित्रपट येथे जोपासला आणि वाढवला. गुलजार, ऋषिकेश मुखर्जी यांच्या चित्रपटात आपण अनेकदा सेमी फ्लॅशबॅक पाहतो. या सेमी फ्लॅशबॅकचा प्रयोग अनंत मानेंनी १९५५ च्या *पुनवेची रात* या चित्रपटाद्वारा मराठीतच सर्वात प्रथम केला. सत्येन बोस यांचा *परिचय* गुलजार यांचा *कोशिश* या दोन चित्रपटांपूर्वीच अनंत मानेंनी १९५३ च्या *अबोली* या आपल्या चित्रपटात मुकी नायिका पडद्यावर आणून मुक्यांची व्यथा मराठीतच सर्वात प्रथम बोलकी केली. राजा ठाकूरनी १९५५ साली *मी तुळस तुझ्या अंगणी* या आपल्या चित्रपटात संगीतिकेचा एक वेगळा प्रयोग केला. राष्ट्रपती सुवर्णपदक हे प्रतिष्ठित पारितोषिक १९५३च्या आचार्य अत्रे यांच्या *श्यामची आई* या मराठी चित्रपटाने सर्वात प्रथम पटकावले. *बाळा जो जो रे, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी* या चित्रपटाद्वारा कौटुंबिक चित्रपटांचे नवे मन्वंतर मराठीत आणत असताना दत्ता धर्माधिकरांनी १९५२ साली *चिमणी पाखरं* या चित्रपटाद्वारा सत्य घटनेवरील चित्रपटांचा एक नवा प्रयोग मराठीत केला आणि १९५३ साली *महात्मा* या चित्रपटाद्वारा मराठी चित्रपट मराठीबरोबरच हिंदीत व इंग्रजीत निर्माण करण्याचे धाडसदेखील त्यांनी केले. माधव शिंदे यांचा *गृह देवता* या काळात ताश्कंदला गेला. शांताराम बापूंच्या *अमर भूपाळी* या चित्रपटाने व्हेनिस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वश्रेष्ठ ध्वनिलेखनाचे पारितोषिक मिळविले. शांताराम आठवले यांचा *शेवग्याच्या शेंगा* त्या काळात चीनला गेला तर राजा ठाकूर यांचा *मुंबईचा जावई* रशियाला गेलेला.

हिंदीत राजकीय पार्श्वभूमीवरील चित्रपटांची जी लाट आज दिसते ती *एक गाव बारा भानगडी* (अनंत माने), *संथ वाहते कृष्णामाई* (मधुकर पाठक), *सामना, सिंहासन* (जब्बार पटेल), *आपलेच दात आपलेच ओठ* (राजदत्त) या चित्रपटांद्वारा मराठीत कधीच आली. नवनवे प्रयोग करण्याची मराठी माणसाची वृत्ती हिंदी व इतर भाषिक चित्रपटाला अशी उपकारक ठरली. म्हणूनच तर मराठी चित्रपटांचे एक वेगळे अस्तित्व आहे. हिंदी व दाक्षिणात्य चित्रपटांची श्रीमंती आज मराठी चित्रपटाजवळ नसली तरी तिचे हे अस्तित्व आपणाला नाकारता येणार नाही. पायाचा दगड म्हणून का होईना, मराठीच्या या अस्तित्वाची दखल आपणाला घ्यावीच लागेल. कारण मराठीच्या या अस्तित्वानेच एकूण भारतीय चित्रपट व्यवसायाचा डोलारा रचला आहे. ●